# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः16.04.2026** **वारः गुरुवार**

---

1. नारीशक्ती वंदन अधिनियमातील सुधारणांवर चर्चा करण्यासाठी आजपासून संसदेचं विशेष अधिवेशन
2. वैद्यकीय व्यवसाय हा मानवसेवेचा एक मार्ग असल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं प्रतिपादन
3. पंतप्रधान नरेंद्र मोदी आज ऑस्ट्रियाचे चान्सलर डॉ. क्रिश्चीयन स्टॉकर यांच्याशी नवी दिल्लीमध्ये चर्चा करणार
4. नाशिकमध्ये टीसीएसच्या बीपीओमध्ये झालेल्या लैंगिक छळ प्रकरणी राष्ट्रीय महिला आयोगाकडून समिती स्थापन आणि
5. महाराष्ट्राच्या विविध भागात उष्णतेचा लाटेचा इशारा; नागरिकांनी आवश्यक काळजी घेण्याचं राज्य सरकारचं आवाहन

**<u>विशेष अधिवेशन</u>**

नारी शक्ती वंदन अधिनियमातील सुधारणांवर चर्चा करण्यासाठी संसदेचं तीन दिवसांचं विशेष अधिवेशन आजपासून सुरू होणार आहे. नारी शक्ती वंदन अधिनियम 2023 मध्ये मंजूर झालं होतं; यामध्ये लोकसभा आणि राज्य विधानसभांमध्ये महिलांसाठी 33 टक्के आरक्षणाची तरतूद करण्यात आली आहे. या अधिनियमाची अंमलबजावणी करण्यासाठी तीन दुरुस्ती विधेयकं विशेष अधिवेशनात सादर करण्यात येणार आहेत. एकशे एकतीसावं दुरुस्ती विधेयक, केंद्रशासित प्रदेश कायदे दुरुस्ती विधेयक, आणि मतदारसंघांच्या पुनर्रचनेशी संबंधित विधेयकाचा यात समावेश आहे. महिलांसाठी आरक्षणाबाबतचा कायदा 2029 च्या लोकसभा निवडणुकांपासून लागू करता यावा, यासाठी आवश्यक घटनादुरुस्ती आणि मतदार संघांची फेररचना पूर्ण करण्याच्या उद्देशाने हे विशेष अधिवेशन होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकसभा आणि राज्यसभेतील सर्व पक्षांच्या नेत्यांना पत्र लिहून या विधेयकांना पाठिंबा देण्याचं आवाहन केलं होतं. महिला आरक्षण विधेयक संतुलित असून, देशातील सर्व राज्य आणि प्रदेशांच्या अपेक्षा लक्षात घेऊन तयार करण्यात आल्याचं संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी काल सांगितलं. दरम्यान, भाजप, संयुक्त जनता दल, लोक जनशक्ती पक्ष आणि काँग्रेससह अनेक पक्षांनी आपल्या खासदारांना सभागृहात उपस्थित राहण्याबाबतचा पक्षादेश जारी केला आहे. महिला आरक्षण विधेयकाला विरोधी पक्षांचा पाठिंबा असेल, मात्र हे विधेयक ज्या पद्धतीने आणलं जात आहे त्याबाबत शंका असल्याचं काँग्रेसचे अध्यक्ष आणि राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी काल सांगितलं. विरोधी पक्षांचा महिला आरक्षण विधेयकाला पाठिंबा असला तरी मतदारसंघांच्या पुनर्रचनेशी संबंधित विधेयकातील तरतुदींना विरोध असेल असं कॉंग्रेस नेते जयराम रमेश यांनी म्हटलं आहे. देशाच्या पहिल्या महिला राष्ट्रपती प्रतिभा पाटील यांनी या महिला आरक्षणाला पाठिंबा जाहीर केला आहे. त्यांनी याबाबतचं पत्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पाठवलं आहे.

**<u>राष्ट्रपती-एम्स नागपूर</u>**

तंत्रज्ञान कितीही प्रगत झाले तरी ते करुणा, प्रामाणिकपणा आणि रुग्णकेंद्री दृष्टीकोनाची जागा घेऊ शकत नाही असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं आहे. त्या काल नागपूर इथं एम्स संस्थेच्या पदवीप्रदान समारंभात बोलत होत्या. वैद्यकीय क्षेत्र हा केवळ व्यवसाय नाही तर संवेदनशीलतेनं मानवसेवा करण्याचा तो एक मार्ग आहे. डॉक्टर्स रोग बरा करण्याबरोबरच रुग्णाच्या मनात आशेची ज्योत जागवण्याचे काम करतात असं राष्ट्रपती यावेळी म्हणाल्या.

या कार्यक्रमाला राज्यपाल जिष्णू देव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव आणि एम्सचे अध्यक्ष डॉ. अनंत पांढरे उपस्थित होते.

**राष्ट्रपती-आयआरएस**

भारतीय महसूल सेवा अधिकाऱ्यांच्या 78 व्या तुकडीच्या प्रशिक्षण कार्यक्रमाची सांगता काल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या उपस्थितीत झाली. नागपूरमधल्या राष्ट्रीय प्रत्यक्ष कर अकादमीमध्ये झालेल्या या कार्यक्रमात राष्ट्रपतींच्या हस्ते 11 गुणवंत अधिकाऱ्यांना सुवर्ण पदक प्रदान करण्यात आलं. राज्यपाल जिष्णू देव वर्मा, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि केंद्रिय प्रत्यक्ष कर मंडळाचे अध्यक्ष रवी अग्रवाल यावेळी उपस्थित होते.

आज सकाळी राष्ट्रपती वर्धा इथल्या सेवाग्राम आश्रमाला भेट देणार असून त्यानंतर त्या महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठाच्या पदवीप्रदान समारंभात सहभागी होतील.

**पंतप्रधान-ऑस्ट्रेलियन चान्सलर**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज ऑस्ट्रियाचे चान्सलर डॉ. क्रिश्चीयन स्टॉकर यांच्याशी नवी दिल्लीमध्ये चर्चा करणार आहेत. विविध क्षेत्रांमधील द्विपक्षीय सहकार्य बळकट करण्याबाबत या बैठकीत चर्चा अपेक्षित आहे. परस्पर हिताच्या प्रादेशिक आणि जागतिक मुद्द्यांवरही ते विचारांची देवाणघेवाण करतील. पंतप्रधान मोदी आणि क्रिश्चीयन स्टॉकर यांच्यातील चर्चेमुळे विविध क्षेत्रांमध्ये अधिक सहकार्याच्या नवीन संधि निर्माण होतील असा विश्वास परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांनी आपल्या समाजमध्यमांवरील संदेशात व्यक्त केला आहे.

**अमेरिकातेलनिर्बंध-पूल**

पश्चिम आशियामध्ये शांतता प्रस्थापित करण्यासाठी राजनैतिक पातळीवर प्रयत्न सुरू असतानाच, अमेरिका इराणच्या बंदरांवरील नाकेबंदी अधिक कडक करत आहे. तर तिकडे इस्रायलची लेबनॉनमध्ये लष्करी कारवाई देखील सुरूच असल्याने तणाव अधिक तीव्र होत आहे.

अमेरिकेनं युद्धविरामाचा कालावधी वाढवण्याची मागणी केल्याचं वृत्त व्हाईट हाऊसच्या प्रवक्त्या कॅरोलाइन लिव्हिट यांनी फेटाळलं आहे. इराण बरोबर राजनैतिक चर्चा सुरू असून अमेरिकन शिष्टमंडळ इराणबरोबरचच्या चर्चेसाठी पुन्हा पाकिस्तानात जाऊ शकतं असं त्या म्हणाल्या.

दरम्यान रशिया किंवा इराणकडून तेल खरेदी करण्यासंदर्भातील निर्बंधांमधून कोणतीही सवलत दिली जाणार नाही असं अमेरिकेनं म्हटलं आहे. व्हाईट हाऊसमध्ये काल आयोजित केलेल्या वार्ताहर परिषदेत अमेरिकेचे अर्थ मंत्री स्कॉट बेसेन्ट यांनी याबाबत माहिती दिली. तेल खरेदीबाबतच्या सवलतींना मुदतवाढ दिली जाणार नाही, असं त्यांनी सांगितलं.

**जनगणना 2027**

देशभरातील काही राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये जनगणना 2027 अंतर्गत, घरसूची आणि घरमोजणी कामाला आजपासून प्रत्यक्ष सुरुवात होणार आहे. गृहमंत्रालयाने जाहीर केलेल्या निवेदनानुसार, अंदमान आणि निकोबार, गोवा, कर्नाटक, लक्षद्वीप, मिझोराम, ओडिशा आणि सिक्कीम या राज्यांमध्ये तसंच दिल्लीतील काही भागात एक महिनाभर ही मोहीम राबवली जाईल. या काळात प्रगणक माहिती संकलनासाठी घरभेटी करतील. दरम्यान, या जनगणनेदरम्यान पहिल्यांदाच सुरू करण्यात आलेल्या स्वयं गणना सुविधेला अत्यंत उत्साहवर्धक प्रतिसाद मिळाल्याचे मंत्रालयाने नमूद केलं आहे. आतापर्यंत 12 लाख कुटुंबियांनी या सुविधेचा लाभ घेत आपली माहिती देऊन स्वयं-गणना प्रक्रिया पूर्ण केली आहे. प्रक्रियेदरम्यान मिळालेला ओळख क्रमांक घरभेटीसाठी आलेल्या प्रगणकाला देण्यासाठी जतन करण्याचा सल्लाही मंत्रालयानं दिला आहे.

**नाशिक प्रकरण**

महाराष्ट्रात नाशिकमध्ये टीसीएसच्या बीपीओमध्ये झालेल्या लैंगिक छळ प्रकरणी तथ्यांची पडताळणी करण्यासाठी राष्ट्रीय महिला आयोगानं एका समितीची स्थापना केली आहे. ही समिती शनिवारी नाशिकमध्ये कंपनीच्या कार्यालयाला भेट देणार आहे. 10 दिवसात या समितीला अहवाल देण्याचे आदेश आयोगानं दिले आहेत. मुंबई उच्च न्यायालयाच्या सेवानिवृत्त न्यायाधीश न्यायमूर्ती साधना जाधव या समितीच्या अध्यक्ष असतील.

दरम्यान नाशिक पोलीसांनी या प्रकरणी दहशतवादविरोधी पथक आणि राष्ट्रीय तपास संस्थेशी पत्रव्यवहार केला आहे, अशी माहिती पोलिस आयुक्त संदीप कर्णिक यांनी काल माध्यमांशी बोलताना दिली. धर्मांतर प्रकरणाची व्याप्ती परदेशापर्यंत पोहचलेली आहे का; परकीय कट्टरपंथीय संघटनांकडून संबंधित आरोपींच्या टोळीला निधी पुरवला जात होता का; असा पोलिसांना संशय आहे, त्याबाबतचे ठोस पुरावे शोधण्याच्या उद्देशानं हा पत्रव्यवहार केल्याचं कर्णिक यांनी सांगितलं.

तर अमरावती जिल्ह्यात अचलपूर-परतवाडा परिसरात अल्पवयीन मुलींचे अश्लील व्हिडिओ व्हायरल झाल्या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी पोलिसांनी विशेष तपास पथकाची स्थापना केली आहे. याप्रकरणी पोलिसांनी मोहम्मद अयाझ याच्यासह 4 जणांना अटक केली आहे.

**परीक्षा निकाल**

सीबीएससी म्हणजेच केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या दहावीच्या शालांत परीक्षेचा निकाल काल जाहीर झाला. एकंदर 93 पूर्णांक 70 टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. 10 फेब्रुवारी ते 10 मार्च कालावधीत परीक्षा झाली होती.

**फिडे बुद्धिबळ**

फिडे महिला बुद्धिबळ स्पर्धेत काल सायप्रस इथं भारताची ग्रँडमास्टर आर.वैशाली हीनं अंतिम फेरीत रशियाच्या कॅटरीना लागनो चा पराभव करत विजेतेपदावर आपलं नाव कोरलं. या विजया बरोबरच, जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत तिनं स्थान मिळवलं असून या वर्षाच्या अखेरीस होणाऱ्या स्पर्धेत चीनच्या ज्यू वेनजूनशी तिचा सामना होणार आहे.

दुसरीकडे खुल्या गटात उजबेकिस्तानच्या जावोखीर सिंदारोव्हनं कॅन्डिडेट्स स्पर्धेतील आपला विजय निश्चित केला. या वर्षाखेरी त्याची विश्वविजेत्या गुकेशशी लढत होईल.

**हवामान**

महाराष्ट्राच्या विविध भागात कमाल तापमानात लक्षणीय वाढ झाली आहे. येत्या दोन-तीन दिवसात मध्य महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ आणि कोकणात काही ठिकाणी उष्णतेची तीव्र लाट येण्याचा इशारा भारतीय हवामान खात्यानं दिला आहे. त्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी काळजी घ्यावी असं आवाहन राज्य सरकारनं केलं आहे. दुपारी 12 ते 4 या वेळेत उन्हात जाणं टाळावं, अत्यावश्यक कामांसाठी बाहेर जाताना उन्हाच्या झळा लागणार नाहीत, याची काळजी घ्यावी, भरपूर पाणी प्यावं, विशेषतः जेष्ठ नागरिक आणि मुलांची काळजी घ्यावी असं आवाहन राज्य सरकारनं केलं आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपल

# नमस्कार